अर्जुन टाकळकर



# कोल्हापूरचा मी आजन्म ऋणी

**म. टा. प्रतिनिधी,** कोल्हापूर

'माझा जन्म जरी सांगली जिल्ह्यातील असला तरी माझी सामाजिक व राजकीय क्षेत्रातील जडणघडण कोल्हापूरनेच केली. सर्वसामान्यांचा आवाज बनून लढण्याची ताकद देणाऱ्या, राजकारणापेक्षा समाजकारणाचे बाळकडू पाजणाऱ्या आणि माणूस म्हणून समाजाचा संवेदनशील घटक बनवणाऱ्या कोल्हापूरचा मी आजन्म ऋणी राहीन', असे भावोद्गार ज्येष्ठ नेते प्रा. डॉ. एन.डी. पाटील यांनी काढले. राजाराम महाविद्यालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या राजाराम महोत्सवाच्या समारोपप्रसंगी डॉ. पाटील यांना ज्येष्ठ पत्रकार डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्या हस्ते राजाराम जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी ते बोलत होते. बुधवारी राजाराम महाविद्यालयाच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला.

प्रा. एन.डी.पाटील म्हणाले, 'महात्मा फुले यांनी लावलेल्या शिक्षणाच्या विचाररोपट्याला राजर्षी शाहू महाराजांनी वटवृक्ष बनवले. शाहू महाराजांनी विविध जातीधर्मातील विद्यार्थ्यांसाठी स्थापन केलेली वसतिगृहे हे त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. राजेपणाची झूल न वागवता सामान्य माणसांसाठी शाहू महाराजांनी राजेपण बहाल केले. राजाराम महाविद्यालयाला आर्थिक मदत करून बडोदा व मुंबईनंतर दर्जेदार शिक्षण देणारे महाविद्यालय असा राजाराम महाविद्यालयाचा नावलौकीक आजही आहे.

या महाविद्यालयात शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात उच्चपदावर कार्यरत आहेत. याच कॉलेजचे प्राचार्य डॉ.आप्पासाहेब पवार यांच्यासोबतीने शिवाजी विद्यापीठाच्या उभारणीत माझा सहभाग देता आला याचे मोठे समाधान आहे. '

## राजाराम महोत्सवात डॉ. एन. डी. पाटील यांना मानपत्र

महाविद्यालयाचे प्राचार्य अण्णासाहेब खेमनार म्हणाले, ' कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक विचारांना व्यापकता देण्याचे काम प्रा. एन.डी. पाटील यांनी केले. या महोत्सवामुळे नव्या जुन्या विद्यार्थ्यांना एकत्र आणता आले. कर्तृत्ववान विद्यार्थ्यांना सन्मान करताना नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना ऊर्जा मिळावी हा हेतू होता.'

यावेळी गुन्हे अन्वेषण विभाग पुणेचे विशेष पोलिस महानिरीक्षक फत्तेसिंह पाटील, डॉ. संजय पाटील व डॉ. विजयकुमार माने यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मंत्रालय महसूल विभागाचे अव्वर सचिव पितांबर भोसले, जीएसटी सेंट्रलचे अधिक्षक महेश व्हटकर,अभिनेत्री प्रांजल पालकर, कुसुम बझे, नितीन पवार, शशिकांत पाटील, हेमंत पाटील व आजी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन भाग्यश्री शिंदे यांनी केले. आभार संजय जाधव यांनी मानले.

### खंडपीठाचा प्रश्न सुटावा ...

प्रा. पाटील म्हणाले,' राजाराम कॉलेजतर्फे जीवनगौरव पुरस्कार स्वीकारण्यात खूप आनंद आहे, कारण मी राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेतले. कोल्हापुरातूनच शेकापच्यावतीने निवडणूक लढवली. तेव्हा माझ्याविषयी परका हा शब्द वापरण्यात आला होता. पण मी कधी कोल्हापूरमध्ये समरस झालो हे मलाही कळले नाही. कोल्हापूरच्या विकासासाठी आपण अनेक आंदोलने केली. त्यात अनेक कार्यकर्ते खांद्याला खांदा लावून लढले. आता माझ्या हयातीत कोल्हापूरच्या खंडपीठाचा प्रश्न सुटावा हीच इच्छा आहे.

# ‘शेतकऱ्यांच्या स्थैर्यातून अर्थव्यवस्था बळकट’

## माजी खासदार शेट्टी; विद्यापीठातील चर्चेत अपेक्षांची मांडणी

कोल्हापूर टाइम्स टीम

‘शेतकऱ्यांचा आर्थिक स्थैर्य मिळाले तरच देशातील अर्थव्यवस्थेला बळकटी येईल. त्यामुळे शेतकऱ्याला डोळ्यासमोर ठेवून अर्थकारणाचा धोरणात्मक आराखडा करण्याची गरज आहे’ असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष, माजी खासदार राजू शेट्टी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभाग व बँक ऑफ इंडिया चेअर इन रुरल बँकिंगच्यावतीने बजेटपूर्व चर्चा कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. बँक ऑफ इंडियाचे रिजनल मॅनेजर नितीन देशपांडे, अर्थशास्त्रज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, ‘स्मॅक’चे अध्यक्ष सुरेंद्र जैन, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. विजय ककडे आदी उपस्थित होते. यावेळी एक फेब्रुवारी रोजी सादर होणाऱ्या केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या.



शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभाग व बँक ऑफ इंडिया चेअर इन रुरल बँकिंग यांच्यावतीने बजेटपूर्व चर्चा या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना माजी खासदार राजू शेट्टी. व्यासपीठावर संजय शेटे, सुरेंद्र जैन, विजय ककडे, डॉ. जे. एफ. पाटील, नितीन देशपांडे आदी.

शेट्टी म्हणाले, ‘अर्थव्यवस्था सातत्याने सक्रिय रहायची असेल तर समाजातील प्रत्येक घटकाची क्रयशक्ती वाढणे गरजेचे आहे. त्यातून अर्थव्यवहारही झाले पाहिजेत. समाजातील शेतकरी वर्गाचेही यामध्ये योगदान वाढले पाहिजे. आधुनिक, तंत्रज्ञानावर आधारीत शेतीचे प्रमाण वाढण्यासाठी शेतकऱ्यांकडून अद्ययावत शेती औजारे, वाहने, उपकरणे यांची खरेदी झाली पाहिजे. शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला तर त्याची क्रयशक्ती वाढेल. त्यातून होणाऱ्या खरेदीमुळे जीएसटीद्वारे सरकारला कर मिळेल. याचा एकत्रित परिणाम हा देशाची आर्थिक घडी सुयोग्य होण्यासाठी होईल.’

नितीन देशपांडे, सुरेंद्र जैन यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

यावेळी संजय शेटे, महेश शिंदे, व्ही. एम. हिलगे, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. पी. एस. कांबळे, किरण कर्नाड, श्रीकांत आडीवरेकर, डॉ. एस. एस. सूर्यवंशी आदींनी मनोगत व्यक्त केले. डॉ. विजय ककडे यांनी प्रास्ताविक केले. अनिल पाटील यांनी आभार मानले.

# पदवीधरांमध्ये यंदा मुलींची बाजी



**Anuradha.kadam**
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभात यावर्षी पदवीधर होणाऱ्या ६० हजार स्नातकांपैकी ३२ हजार मुलींचा समावेश असून उच्च शिक्षणात पदवीधर होण्यात यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. गेल्या तीन वर्षांचा आलेख पाहता पदवी व पदव्युत्तर शिक्षणात मुलींनी आपला टक्का वाढता ठेवला असून यावर्षीही हे स्थान कायम राहिले आहे. यंदा विज्ञान व तंत्रज्ञान या अभ्यासशाखेतून १४ हजारांवर मुली पदवीधर होणार आहेत, तर एकूण स्नातकांमध्ये पदवीधर होणाऱ्या मुलांची संख्या २६८०१ इतकी आहे.

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ ६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. विद्यापीठाचे कुलपती तथा राज्यपाल भगतसिंग कोश्यारी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा दीक्षान्त समारंभ होणार आहे. या समारंभात २०१९ मध्ये पदवी व पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यामध्ये विज्ञान, कला, वाणिज्य, मॅनेजमेंट, व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे. गेल्यावर्षीप्रमाणे यावर्षीही महाविद्यालयीन स्तरावरील पदवी प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या अखत्यारीतील महाविद्यालयांमध्येच देण्यात येणार आहेत. त्यासाठी महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र कार्यक्रमात पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्याच्या सूचना विद्यापीठ प्रशासनाने महाविद्यालयाच्या प्राचार्यांना दिल्या असून, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे पाठवण्याचे काम सुरू झाले आहे.

यावर्षी दीक्षान्त कार्यक्रमात प्रत्यक्ष पदवी प्रमाणपत्र स्वीकारणाऱ्या स्नातकांची संख्या २०६५ असून यामध्ये ११५४ मुली तर ९११ मुले आहेत. यामध्ये शिवाजी विद्यापीठातील अधिविभागातील पदव्युत्तर पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांचाच समावेश आहे. महाविद्यालयांमध्ये पदवीप्रमाणपत्र स्वीकारणाऱ्या स्नातकांची संख्या ३५ हजार ६६८ इतकी असून यामध्ये १९१२२ मुली तर १६५४६ मुले आहेत. पोस्टाने पदवीप्रमाणपत्र स्वीकारणाऱ्या स्नातकांची संख्या २२५३४ असून यापैकी १२१९० मुली तर ९३४४ मुले आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान अभ्यासशाखेतून पदवी घेणाऱ्या एकूण २९ हजार विद्यार्थ्यांपैकी मुलींची संख्या १४ हजार असून हे प्रमाण मुलांच्या तुलनेत ५० टक्क्यांच्या रेषेवर आहे.

**६० हजार स्नातकांपैकी ३२ हजार मुली**

## महाविद्यालयात पदवी घेणारे विद्यार्थी

| शाखा | मुले | मुली |
|---|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | ९६२८ | ८७९२ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | ३३४९ | ५६९० |
| मानव्यशास्त्र | ३२९३ | ४०३९ |
| आंतरविद्याशाखा | २७६ | ६०१ |



## प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र स्वीकारणारे विद्यार्थी

| शाखा | मुले | मुली |
|---|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | ५८५ | ७७४ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | ४४ | ५९ |
| मानव्यशास्त्र | २३४ | २४७ |
| आंतरविद्याशाखा | ४८ | ७४ |

## पोस्टाने पदवी प्रमाणपत्र स्वीकारणारे विद्यार्थी

| शाखा | मुले | मुली |
|---|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | ५००९ | ४४४८ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | १०९७ | ३५०१ |
| मानव्यशास्त्र | ३००५ | ३८२७ |
| आंतरविद्याशाखा | २३३ | ४१४ |

- व्याख्यानमाला : शिवाजी विद्यापीठ मराठी विभागातर्फे वि. स. खांडेकर जयंती व्याख्यानमाला. विषय : वि. स. खांडेकर यांच्या साहित्याचे पुनर्वाचन. वक्ते : डॉ. एकनाथ पगार. स्थळ : भौतिकशास्त्र सभागृह, शिवाजी विद्यापीठ. वेळ : सकाळी ११.30 वा.

# विद्यापीठाची वाटचाल लवकरच पुस्तकरूपात

## समिती सदस्य करणार विनामोबदला लेखन

दशकाचा कालखंड पुस्तकरुपाने पुढे येणार आहे. ग्रामीण भागातील मुलांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी १९६२ मध्ये शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली. आजपर्यंतच्या वाटचालीत शिवाजी विद्यापीठाने उच्च शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'लोकल टू ग्लोबल'अशी झेप घेताना संशोधन, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम, देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित शैक्षणिक संस्थांशी सामंजस्य करार केले आहेत. २०१२ मध्ये विद्यापीठाचा सुवर्णमहोत्सव झाला. तेव्हापासून विद्यापीठाच्या आतापर्यंतच्या कालखंडावर इतिहास लेखनाचा विचार पुढे आला.

विद्यमान कुलगुरू देवानंद शिंदे यांनी विद्यापीठाचा इतिहास पुस्तकरुपात मांडण्याच्या विचाराला मूर्त रुप देण्याचे ठरविले. विद्यापीठाच्या अधिकार मंडळासमोर हा विषय मांडला. विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या मान्यतेनंतर इतिहास लेखन समितीसाठी चौघांची समिती नेमली आहे. इतिहास लेखन समितीचे अध्यक्षपद प्रा. डॉ. भालबा विभूते यांच्याकडे आहे. अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, प्राचार्य टी. एस. पाटील, प्राचार्य आय. एच. पठाण यांचा लेखन समितीत समावेश आहे. विशेष म्हणजे, हे चौघेही विद्यापीठाशी निगडीत आहेत. अधिकार मंडळावर काम केल्याचा अनुभव आहे.

> शिवाजी विद्यापीठाच्या आजपर्यंतचा इतिहास शब्दबद्ध केला जात आहे. विद्यापीठाच्या स्थापनेचा पूर्वइतिहास, विद्यापीठाची स्थापना, आतापर्यंतचा इतिहास, संशोधन, प्रत्येक विभागाची वाटचाल अशा प्रत्येक घटकांवर फोकस राहणार आहे. जून महिन्यापर्यंत समितीकडून लेखन प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
>
> – डॉ. भालबा विभूते, अध्यक्ष, इतिहास लेखन समिती

# ‘आत्मविश्वासाने स्पर्धेला सामोरे जा’

कोल्हापूर : ‘स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासात लेखी परीक्षेसोबत मुलाखतीचीही तयारी करावी. अभ्यास करताना आपले काय चुकते याचे बारकावे टिपावे’ अशा शब्दात सांगली आयकर विभागाचे डेप्युटी कमिशनर महेश लोंढे यांनी स्पर्धा परीक्षार्थींना मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठातील सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रात लोंढे यांनी त्यांचा यशस्वी प्रवास उलगडला. योगिराज बच्चू यांनी मुलाखतीतून लोंढे यांना बोलते केले.

लोंढे म्हणाले, ‘माझे शालेय शिक्षण ग्रामीण भागात झाले. अत्यंत सामान्य कुटुंबात वाढलो. कॉलेजपासून लेखन, वाचनाची आवड यातून स्पर्धा परीक्षेकडे वळण्याची गोडी लागली. ग्रामीण भागातील युवकांनी न्यूनगंड बाजूला सारून आत्मविश्वासाने तयारी करावी.’

केंद्र समन्वयक प्रा. डॉ. पी. एस.कांबळे यांनी प्रास्ताविक केले. सचिन कदम यांनी आभार मानले.